अपील अधिकारी तथा सामान्य प्रशासन विभाग
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
शिवाजीनगर पुणे ४११००५
दूरध्वनी क्र. ०२०-२५५०११२३
ई मेल aadmcgeneral@punecorporation.org
अपील क्र.७६/२०२४

जा.क्र उआ(सा.प्र.)/ आस्था/५८३३दि.२६ /८/२०२४

अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त , सामान्य प्रशासन विभाग, पुणे महानगरपालिका

अपील क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा.उआ(सा.प्र.)/अपिल/७६/२०२४

श्री.रमेश विष्णू खामकर
२६४, नारायण पेठ
पुणे-४११०३०

---------------- अपिलार्थी

विरुद्ध

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी**
आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका

---------------- प्रतिवादी

श्री.रमेश विष्णू खामकर, २६४ नारायण पेठ, पुणे-४११०३० (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांनी मूळ माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये दि.१/७/२०२४ (आ.क्र.५५८३, दि.५/७/२०२४) रोजी महापालिका आयुक्त कार्यालय (जा.क्र.३१७० दि.५/७/२०२४) यांचेकडून प्राप्त झाला आहे.

अपिलार्थी यांचे मूळ अर्जातील माहितीबाबत जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी जा.क्र.जमाअ/आस्था/४४१३, दि.३०/७/२०२४ अन्वये अर्जास माहिती दिलेली आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचा दि. | माहिती द्यावयाचा अंतिम दि. | अपिलार्थीस उत्तर/माहिती पाठविल्याचा दि. | विलंब दिवस |
| १/७/२०२४ | ५/७/२०२४ | ४/८/२०२४ | ३०/७/२०२४ | ० |

श्री.बिपीन शिंदे, कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग यांची तात्काळ बदली करणे याबाबत श्री.चर्तुभूज मिलिंद, जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी आयुक्त कार्यालय, पुणे मनपा आ.क्र.६१५४ दि.१/७/२०२४ अन्वये माहिती अधिकार अर्ज केला असता त्याचे आजपर्यंत माहिती न मिळाल्याने मी अर्ज करित आहे, असे नमूद करुन दि.२/८/२०२४ रोजी (आ.क्र.७७५१ दि.२/८/२०२४) अपिल अर्ज दाखल केला आहे.

| अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अपील अर्जाचा दिनांक | अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दि. | अपील दाखल करावयाचा अंतिम दि. | अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | अपील अर्जाच्या विलंब बाबत निवेदन दिले आहे का? |
| २/८/२०२४ | २/८/२०२४ | २९/८/२०२४ | होय | --- |

सदर अपिलाची सुनावणी दि.२१/८/२०२४ रोजी सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यात आली असल्याचे जा.क्र.उप आयुक्त (सा.प्र.)/आस्था/५१९७, दि.१३/८/२०२४ रोजी कळविण्यात आले आहे. सुनावणीस अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी ,आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका हे उपस्थित होते .

## विवेचन

श्री.बिपीन शिंदे, कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग यांची तात्काळ बदली करणे याबाबत श्री.चर्तुभूज मिलिंद, जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी आयुक्त कार्यालय, पुणे मनपा आ.क्र.६१५४ दि.१/७/२०२४ अन्वये माहिती अधिकार अर्ज केला असता त्याचे आजपर्यंत माहिती न मिळाल्याने मी अर्ज करित आहे, असे नमूद करुन दि.२/८/२०२४ रोजी (आ.क्र.७७५१ दि.२/८/२०२४) अपिल अर्ज दाखल केला आहे.

मूळ माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये दि.१/७/२०२४ (आ.क्र.५५८३, दि.५/७/२०२४) रोजी महापालिका आयुक्त कार्यालय (जा.क्र.३१७० दि.५/७/२०२४) यांचेकडून प्राप्त झाला आहे. श्री.बिपीन शिंदे, कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग यांची तात्काळ बदली करणेबाबत महापालिका आयुक्त यांचे कार्यालयात अर्ज दाखल केला होता याबाबत माहिती केलेल्या कार्यवाहीबाबत माहिती मागितली आहे.

श्री.बिपीन शिंदे हे सन २०१३ पासून एकाच खात्यात असून पदोन्नती देखील त्याच खात्यात होते. पदोन्नत्ती अथवा दर तीन वर्षाने सेवकाची बदली होणे अपेक्षित आहे, असे अपिलार्थी यांनी सुनावणी दरम्यान नमूद केले.

पदोन्नती व बदलीबाबतची कार्यवाही सूरु आहे. सबब, त्याबाबत फक्त कळविण्यात आले आहे असे सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी नमूद केले.

अधिकारी/कर्मचारी यांची एकाच खात्यात नियुक्ती, बदली व पदोन्नती देणे हा निर्णय सामान्य प्रशासन विभागाच्या अधिकार कार्यक्षेत्रात येत नाही. प्रस्ताव सादर करण्याची प्रक्रिया सामान्य प्रशासन विभागामार्फत

करण्यात येते. नियुक्ती, बदली व पदोन्नती याबाबतचे सर्वस्वी निर्णय वरिष्ठ पातळीवर घेण्यात येतात. मूळ अर्जातील माहितीसाठी उत्तर पुन्हा तयार करुन सार्वजनिक स्वरुपाचे अभिलेखे, अपिलार्थी यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्यावे, असे अपिलाधिकारी यांनी सुनावणी दरम्यान नमूद केले. सबब, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग यांनी मूळ माहिती अधिकार अर्जातील माहिती पुन्हा तयार करुन सार्वजनिक स्वरुपाचे अभिलेखे विनामूल्य आदेश प्राप्तीपासून ८ दिवसात उपलब्ध करुन देण्यात यावेत. त्यानुसार, सदर अपिल क्र.७६/२०२४ निकाली काढण्यात येत आहे.

P.Patil
26.8.24.
(प्रतिमा पाटील)
अपिलीय प्राधिकारी तथा
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका

---

सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या मुदतीत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे-१ यांचेकडे व्दितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतुद आहे.

सदर निकालाची प्रत पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

प्रत/-
जन माहिती अधिकारी,
आस्थापना विभाग,
पुणे महानगरपालिका.